महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२०-२१/२०२०/४८. दिनांक : ०५.०१.२०२०

05 JAN 2021

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांच्या कार्यवाहीबाबत..

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/२०२०/३७७ दिनांक ०३.१२.२०२०.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणा-या योजनांकरीता बनविण्यात आलेल्या **महाडीबीटी पोर्टलद्वारे** (संकेतस्थळ - www.mahadbtmahait.gov.in) तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात,

**१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.**
**२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना.**
**३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना**

उपरोक्त विषयास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता, महाडीबीटी पोर्टल दिनांक ०३.१२.२०२० पासून शासनाकडून सुरु करण्यात आलेले आहे. तरी सर्व संस्थांना खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१. संस्थांनी Institute Profile अंतर्गत सर्व माहिती जसे Fee details etc. अद्ययावत करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावी.
२. सर्व पात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्जामध्ये विद्यार्थ्याच्या सेव्हींग बॅक खात्याशी सलग्न असलेला आधार क्रमांक अपडेट करुन घेणे याबाबत संस्थांनी योग्य ती दक्षता घ्यावी. अन्यथा या कारणास्तव विद्यार्थ्याचा अर्ज नामंजूर झाल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.
३. सर्व पात्र विद्यार्थ्यांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी सूचना देण्यात यावी. तसेच, संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये प्राप्त होणारे अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता तपासणी करून पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे.
४. तसेच, **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना"** या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करताना, विद्यार्थी शिक्षणासाठी वसतिगृहामध्ये किंवा पेईंगगेस्ट म्हणून राहात असलेबाबतची संपूर्ण शहानिशा करुनच योजनेच्या अटी व शर्तीनुसार अर्ज तपासणी (मंजूर/नामंजूर) करावे. अपात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.
५. विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व महाराष्ट्र शासनाच्या (DBT Portal) पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्थांनी योग्य ती दक्षता घ्यावी.
६. विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन-दोन योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही योजनांचा) लाभ प्राप्त करुन घेतल्यास किंवा संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्याचे आढळून आल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. दि. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

E:\Yogesh Kelkar\MahaDBT 2020-21\Cicular for updation of inst profile_2020-21.docx